जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २५ दिनांक - १२/०१/२०२५**

## गुन्हे शाखा,पुणे शहर

## नायलॉन मांजा बाबत

नायलॉन मांजामुळे वारंवार गंभीर घटना होत असल्याने त्याअनुषंगाने मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेशकुमार यांनी पतंगाचा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विकणारे दुकानदार, पुरवठादार व वापर करणारे यांच्यावर कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने गुन्हे शाखे कडून खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

### गुन्हे शाखा युनिट ४ पुणे शहर

### नायलॉन मांजा कारवाई बाबत

युनिट-४ कडील पथक येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत कृत्रिम वेगवेगळ्या रंगाचा लेप लावलेला नायलॉन मांजा विक्री करणारे दुकानदार चेक करीत असताना पोलीस अंमलदार विशाल गाडे व हरीष मोरे यांना बातमी मिळाली की शेलार चाळ, मच्छी मार्केट,येरवडा पुणे येथील सार्वजनिक बोळी मध्ये एक महिला कृत्रिम लेप लावलेला नायलॉन मांजा विक्री करीत आहे' मिळालेल्या बातमीप्रमाणे खात्री केली असता नायलॉन मांजा विक्री करणारी एक महिला वय ३७ वर्षे रा.शेलार चाळ गाडीतळ येरवडा पुणे ही मिळून आल्याने तिच्या ताब्यात ३,२००/-रु कि.वेगवेगळ्या रंगाच्या बंदी असलेला नायलॉन मांजाची चार चकरी मिळून आल्याने तिच्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २४/२०२५ बीएनएस कलम २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६चे कलम ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गुन्हे शाखा युनिट १. पुणे शहर

### नायलॉन मांजाची विक्री करणारा विधीसंघर्षित बालक ताब्यात

वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे शाखा युनिट १ कडील पो. उप निरी. तापकीर, व स.पो.फौ. मखरे, पोलीस अंमलदार दरेकर, साळुंखे,जाधव, कोळगे, साबळे पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार निलेश साबळे यांना मिळाल्या बातमी च्या अधारे सर्वे नं ७ तळजाई पठार पुणे येथून एका आपचारिक बालकास कि. रु. ४,५००/- चा नायलॉन मांजा विक्री करिता जवळ बाळगला असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याच्या विरुद्ध भा. न्या. सं. कलम २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ०५ प्रमाणे फिर्याद दिली असून आपचारिक बालकास सहकारनगर पोलीस स्टेशन च्या ताब्यात देण्यात आले आहे.

### दरोडा वाहन चोरी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर

### नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांना घेतले ताब्यात

दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ कडील.अंमलदार पश्चिम प्रादेशिक विभागात पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार श्रीकांत दगडे व दत्तात्रय पवार यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मित्र मंडळ चौकाकडून पर्वतीकडे जाणाऱ्या कॅनॉल रोडचे अंतर्गत रोडवरील ठिकाणी दोन इसम नायलॉन मांजाची विक्री करिता येणार असलेबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जाऊन, सदर इसमांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नाव, पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे, पत्ते १) शशांक चंद्रप्पा धनगर, वय १९ वर्ष, रा. गणेश मळा, सिंहगड रोड, पुणे, २) रोहित राम शिंदे, वय ३४ वर्ष, रा. पर्वती दर्शन, पुणे असे असल्याचे सांगितले. त्यांच्या ताब्यात विक्री करण्यासाठी आणलेल्या ४,८००/- रु. किं.च्या चायनीज नायलॉन मांजाच्या एकुण ६ चकरी मिळाल्या . वरील नमुद दोन्ही इसमांवर पर्वती पोलीस स्टेशन येथे भा.न्या सं. कलम २२३ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ०५ प्रमाणे

गुन्हा दाखल करण्यात आला. नमुद दोन्ही इसमांना पुढील योग्य त्या कारवाईकरिता पर्वती पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले आहे

वरील कारवाई ह्या मा.अपर पोलील आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे व मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेल्या आहेत.